नवी आशा नवी दिशा
सार्वमत

धाराशिव-तुळजापूर रेल्वेमार्गाचे २५ टक्के काम पूर्णत्वाकडे

धाराशिव– धाराशिव-तुळजापूर या पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटर कामापैकी साधारणपणे आठ किलोमीटर अंतराचे काम मोठ्या वेगात सुरू आहे. जवळपास २५ टक्के काम पूर्णत्वाकडे आले असून या मार्गावर एकूण लहान-मोठे एकूण ५० पूल असणार आहेत. त्यापैकी सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर १०६ मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल साकारला जाणार असल्याची माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

हिवाळी अधिवेशनादरम्यान लोकसभेत ७२ तास वाया

नवी दिल्ली– अधिकृत आकडेवारीनुसार, संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान लोकसभेत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या खासदारांमुळे खूप मोठ्या प्रमाणात व्यत्यय आल्याचे पहायला मिळाले. यामध्ये पहिल्या सत्रात एकूण ५ तास ३७ मिनिटे, दुसऱ्या सत्रात १ तास ५३ मिनिटे आणि तिसऱ्या व शेवटच्या सत्रात ६५ तास १५ मिनिटे वाया गेली. चर्चेच्या दृष्टीने, लोकसभेत पहिल्या सत्रात ३४ तास १६ मिनिटे चर्चा झाली. तर ही चर्चा दुसऱ्या सत्रात ११५ तास २१ मिनिटांवर गेल्याचे पाहायला मिळाले.

महत्त्वाचे

श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक केंद्रात गुरुचरित्र पारायणाची आरतीने सांगता

नेवासा (शहर प्रतिनिधी)– नेवासा येथील दुर्गादेवी मंदिरामध्ये दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक केंद्रात गुरुचरित्र सामूहिक पारायणासह विविध धार्मिक कार्यक्रमाने श्री दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी नित्यस्वाहाकार, श्रीदत्त व श्री स्वामी समर्थ प्रतिमा पूजन, नामजप व महानैवेद्य आरती सोहळ्याने दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. रविवारी दि.१५ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आलेल्या श्री दत्त जन्म सोहळ्याच्या प्रसंगी दुपारी १२.३९ वाजता गुरुचरित्र ग्रंथातील अध्यायाचे वाचन करून जन्माची ओवी पूर्ण होताच उपस्थित सेवेकरी व भाविकांनी दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराचा जयघोष केला. सर्व आरत्या व मंत्रपुष्पांजली झाल्यानंतर राहिलेला अध्याय पूर्ण करण्यात आला. याप्रसंगी सेवेकरी उपस्थित होते. यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. प्रसाद म्हणून पेढे, केळी, शाबुदाणा खिचडी फराळ प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी श्री स्वामी समर्थ यांच्या मुख्य दरबारास आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.

गंगागिरी महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यास २३ डिसेंबरपासून प्रारंभ

माळवाडगाव (वार्ताहर)– श्रीरामपूर तालुक्यातील



श्रीक्षेत्र सराला बेट, (गोदावरी धाम) येथे योगिराज सद्गुरू गंगागिरी महाराज यांच्या १२२ वा. पुण्यतिथी सोहळ्यास सोमवार दि. २३ डिसेंबरपासून प्रारंभ होत असून सोमवार दि. ३० डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता महंत रामगिरी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने पुण्यातिथी सोहळयाची सांगता होणार आहे. योगिराज सद्गुरू गंगागिरी महाराज यांच्या पुणयातिथीनिमित्ताने येथे सालाबादप्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताह तसेच श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व संत तुकाराम महाराज गाथा भजन, असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. सप्ताहानंतर महंत गुरुवर्य रामगिरी महाराज यांचे रविवारी दि.२९ रोजी सायंकाळी ४ वाजता पुण्यतिथीनिमित्त कीर्तन नंतर आमटी भाकरी पगंत होईल. सोमवारी दि.३० रोजी सकाळी ११ वाजता काल्याचे कीर्तन होईल व त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद वाटप होणार आहे. त्यामुळे भाविकांनी या सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सद्गुरू गंगागिरी महाराज विश्वस्त व भक्त मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

साई संस्थानच्या नवीन प्रकल्पासाठी सीएसआर फंडातून मदत देणार

आनंद महिंद्रा : साईसमाधीचे घेतले दर्शन

शिर्डी (प्रतिनिधी)– देशातील नंबर दोनचे श्रीमंत देवस्थान असलेल्या शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानच्या नवीन प्रकल्पासाठीही सीएसआर फंडातून मदत करणार असल्याची ग्वाही महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे संचालक आनंद महिंद्रा यांनी दिली.

आनंद महिंद्रा यांनी शुक्रवारी दुपारी माध्यान्ह आरतीला हजेरी लावत साईबाबा समाधीचे दर्शन घेतले. यावेळी साईबाबा संस्थानच्यावतीने त्यांना साईंची मूर्ती देत सत्कार करण्यात आला. यावेळी साईबाबांचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर, प्र. उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप भोसले, प्रशासकीय अधिकारी प्रज्ञा महांडुळे-सिनारे, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी मंदिर विभाग पर्यवेक्षक राजेंद्र पवार आदी उपस्थित होते. महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी लवकरच आपले नवीन चारचाकी वाहन बाजारात उतरवणार आहे. परंपरे प्रमाणे ते नवीन वाहनाचे मॉडेल सर्वप्रथम साई चरणी दान म्हणून अर्पण करणार आहे. आपल्या कंपनीचे प्रत्येक नवीन लॉन्च होणारे पहिले वाहन शिर्डी येथे येऊन श्री साईबाबा संस्थानला देणगी स्वरूपात देत असतात.

जनतेचा विश्वास सार्थ करण्याची शक्ती मिळावी

विनोद तावडे परिवारासह साईचरणी नतमस्तक

शिर्डी (प्रतिनिधी)– महाराष्ट्रातील जनतेने आमच्यावर जो विश्वास दाखवला तो सार्थ करण्याची शक्ती मिळावी, अशी प्रार्थना साई चरणी केली असल्याचे भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी सांगितले.

विनोद तावडे यांनी सपत्नीक शुक्रवारी दुपारी माध्यान्ह आरतीला हजेरी लावून श्री साईबाबा समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. साई दर्शनानंतर साईबाबा संस्थानच्यावतीने प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी प्र. उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप भोसले, प्रशासकीय अधिकारी प्रज्ञा महांडुळे-सिनारे, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी, मंदिर विभाग पर्यवेक्षक राजेंद्र पवार, शिवाजी गोंदकर, गजानन शेर्वेकर, सचीन तांबे, शहराध्यक्ष सचिन शिंदे, नरेश सुराणा आदींसह शिर्डी ग्रामस्थ उपस्थित होते. साई दर्शनानंतर तावडे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना राजकीय विषयावर भाष्य करणे टाळले. मात्र महाराष्ट्रातील जनतेने आमच्यावर जो विश्वास दाखवला तो सार्थ करण्याची आणि राज्य सरकारला पाच वर्षे गोरगरीब जनतेची कामे करण्याची शक्ती मिळावी, अशी प्रार्थना साईचरणी केल्याचे विनोद तावडे म्हणाले.

बस व कंटेनर धडकेत कंटेनर थेट बंगल्यात शिरला

नगर-मनमाड महामार्गावर लोहगाव शिवारातील घटना

लोहगाव (वार्ताहर)– नगर-मनमाड महामार्गावर लोहगाव शिवारामध्ये हॉटेल अजित जवळ लक्झरी बस व कंटेनरचा अपघात झाला. या अपघातात कंटेनर जवळच असलेल्या बबन चेचरे यांच्या बंगल्याचे गेट तोडून बंगल्यासमोर उभा असलेला ट्रॅक्टर उडवून बंगल्याची भिंत फोडून बंगल्यात घुसला. सुदैवाने यात जिवीतहानी टळली मात्र चेचरे यांच्या बंगल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

नगरकडून शिर्डीकडे जाणाऱ्या लक्झरी बस क्रमांक एमएच १८ बीजी ९३०० व मनमाडकडून नगरकडे जाणारा कंटेनर क्रमांक जीजे ०६ बीटी ८३३४ हॉटेल अजित जवळ समोरासमोर धडक झाली. या धडकेत कंटेनर जवळच असलेल्या बबन हौशीराम चेचरे यांच्या घरात रात्री १.४० वाजता घुसला. कंटेनरचा वेग इतका जोरात होता की त्याने घरासमोरील तारकंपाउंड, नारळाचे एक झाड मुळासकट उन्मळून पाडले. घराशेजारी लावलेला ट्रॅक्टर या कंटेनरने दाबला. कंटेनर घराच्या भिंतीला आदळल्याने भिंत तुटली. या घरात चेचरे कुटुंबातील काही सदस्य झोपलेले होते. घरातील व्यक्तींना इजा झाली. घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दैव बलवत्तर म्हणून त्यांच्या घरातील कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही. या अपघाता संदर्भात पोलीस स्टेशनला नोंद करण्यात आली असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

टाकळीभानच्या संत सावता सोसायटीच्या चेअरमनपदी तनपुरे; व्हा. चेअरमनपदी शिरसाठ

टाकळीभान (वार्ताहर)– श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्वभागातील प्रतिष्ठेच्या व जिल्हा सह.बँकेचे संचालक करण ससाणे यांच्या मार्गदर्शनाखालील संत सावता माळी विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीच्या नूतन चेअरमनपदी ज्येष्ठ संचालक बाबासाहेब तनपुरे यांची तर व्हाईस चेअरमनपदी शिवाजी शिरसाठ यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी सहायक निबंधक कार्यालयाचे सहकार अधिकारी आर.के. जाधव व मुख्य लिपिक आर. एस. जोशी यांनी या निवडी घोषित केल्या. यावेळी ज्येष्ठ नेते ज्ञानदेव साळुंके, माजी सरपंच मंजाबापू थोरात, शिवाजी शिंदे, दत्तात्रय नाईक, बाजार समितीचे संचालक मयुर पटारे, मधुकर कोकणे, भाऊसाहेब मगर मान्यवर उपस्थित होते.

येथील श्री संत सावता माळी विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी गेल्या १५ वर्षांपासून सभासदाभिमुख कामकाज करून सातत्याने शंभर टक्के कर्जाचा वसूल करत आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर प्रत्येकवर्षी नवीन पदाधिकारी निवडीचा निर्णय संचालक मंडळाने घेतला होता. त्यामुळे चेअरमन बाबासाहेब लोखंडे व स्थापनेपासून व्हा. चेअरमनपद सांभाळणारे चंद्रकांत लांडगे यांनी आपापल्या पदाचे राजीनामे दिल्याने सहायक निबंधक कार्यालयाकडून पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. तर भटक्या वि.जा. मतदार संघातील एका रिक्त जागेवर संचालक नियुक्त करण्यासाठीही कार्यक्रम घोषित करण्यात आल्याने भटक्या जा. वि.जा. मतदार संघाच्या संचालकपदी जलाल फरीद कुरेशी यांची नियुक्ती करण्यात आली. तर चेअरमन व व्हा. चेअरमन पदासाठी अनुक्रमे बाबासाहेब दत्तात्रय तनपुरे व शिवाजी रभाजी शिरसाठ असे दोनच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय आधिकारी जाधव व जोशी यांनी वरील प्रमाणे बिनविरोध निवडी झाल्याचे घोषित केले.

यावेळी संस्थेचे संचालक, टाकळीभान सोसायटीचे चेआरमन एकनाथ पटारे, व्हा. चेअरमन रोहीदास बोडखे, बाबासाहेब बनकर, बापू शिंदे, श्रीधर गाडे, अनिल पटारे, महेंद्र संत, मोहन रणनवरे, विलास दाभाडे, तुकाराम बोडखे, विकास मगर, प्रविण बनककर, अबासाहेब ढुस, बाबासाहेब दाभाडे, नंदू तनपुरे, महेश लेलकर, अबासाहेब तनपुरे, किशोर दाभाडे, रमेश पटारे आदी उपस्थित होते. संस्थेचे सचिव रामनाथ ब्राम्हणे, रविंद्र शिरसाठ व विठ्ठल बनकर यांनी निवडीकामी सहाय्य केले. निवडीनंतर गुलालाची उधळण करीत फटाके फोडण्यात आले.

बनावट मेडिकल सर्टीफिकेटच्या आधारे बनविले मृत्यूपत्र

देडगावच्या दोन जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल

नेवासा (तालुका प्रतिनिधी)– बनावट मेडिकल सर्टीफिकेटच्या आधारे मृत्यूपत्र तयार करून घेतल्याप्रकरणी देडगाव येथील दोन जणांविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेवासा तालुक्यातील देडगाव येथील श्रीधर कुंडलिक मुंगसे यांनी त्यांचे नातू भगवान कैलास मुंगसे व बाजीराव कैलास मुंगसे यांच्या नावावर देडगाव येथील शेत गट नं. ४३० मधील १ हेक्टर ७९ आर हे क्षेत्र मृत्यूपत्र करून त्यांना दिले होते. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी ज्ञानदेव श्रीधर मुंगसे (रा.देडगाव) यांनी सह जिल्हा निबंधकांकडे अर्ज केला, सदर अर्जाच्या चौकशीचे आदेश दुय्यम निबंधक (सब रजिस्टर) अंबादास जगन्नाथ पवार यांना देण्यात आले. त्याअनुषंगाने त्यांनी चौकशी केली असता, सदर मृत्यूपत्र करतेवेळी वरील लोकांनी श्रीधर कुंडलिक मुंगसे (वय ८५) यांचे वैद्यकीय अधिकारी (ग्रामीण रुग्णालय, मिरी) यांच्याकडील फिटनेस सर्टिफीकेटबाबत मिरी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र पाठवले, त्यावर तालुका आयोग्य अधिकारी डॉ.भगवान उत्तम वराडे यांनी दि.१९ नोव्हेंबर २०२२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, मिरी येथे श्रीधर कुंडलिक मुंगसे या नावाचे कोणीही व्यक्ती वैद्यकीय तपासणीसाठी आलेली नाही. तसेच रजिस्टरला याबाबत नोंद नाही, असे लेखी पत्र दिले, त्यामुळे श्रीधर कुंडलिक मुंगसे यांची जमीन भगवान कैलास मुंगसे व बाजीराव कैलास मुंगसे यांच्या नावावर करतेवेळी श्रीधर कुंडलिक मुंगसे यांचे बनावट मेडिकल तपासणी सर्टीफिकेट दिले असल्याचे निदर्शनास आले.

याप्रकरणी दुय्यम निबंधक (सबरजिस्टर) अंबादास जगन्नाथ पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भगवान कैलास मुंगसे व बाजीराव कैलास मुंगसे यांच्याविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४२०, ४६७, ४६८, ३४ व नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

अल्पवयीन मुलीचा विनयभंग करीत अपहरणाचा प्रयत्न

राहुरी तालुक्यातील जांभळी परिसरातील घटना

राहुरी (प्रतिनिधी)– शाळा सुटल्यावर घरी जात असलेल्या अल्पवयीन शाळकरी मुलीचा विनयभंग करून तिचे अपहरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र सदर मुलीने आरडाओरड करून तेथून पळ काढला. ही घटना राहुरी तालुक्यातील जांभळी परिसरात दि. १८ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली आहे.

राहुरी तालुक्यातील जांभळी परिसरात दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान एक अल्पवयीन मुलगी शाळा सुटल्यानंतर आपल्या घरी जात होती. त्यावेळी वावरथ येथील अनिकेत संजय बाचकर या तरुणाने सदर अल्पवयीन मुलीचा विनयभंग करत अपहरण करण्याचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. आरोपी तरुणाने त्या अल्पवयीन मुलीस मोटारसायकल आडवी लावली व त्या मुलीचा हात धरून गाडीवर बसवून त्या मुलीचा विनयभंग करत अपहरण करण्याचा प्रयत्न केला. त्या तरुणीने प्रसंगावधान दाखवत त्याचा हात हिसकावत आरडाओरडा करत आपल्या वस्तीकडे पळ काढला. त्या ओढातणीत मुलगी खाली पडल्याने तिच्या हाताला मार लागला. ते पाहून त्या तरुणाने तेथून धूम ठोकली. त्या मुलीने रडत रडत घर गाठले व तिच्या आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितला. सदरच्या प्रकाराने ती अल्पवयीन मुलगी घाबरुन गेल्याने तिच्या आई-वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन आरोपी अनिकेत संजय बाचकर या तरुणा विरोधात दिलेल्या फिर्यादीवरून पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेनंतर आरोपी पसार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ करत आहेत.

तज्ज्ञांमार्फत साई मूर्तीची पाहणी

शिर्डी (प्रतिनिधी)– विश्वाला श्रध्दा सबुरी बरोबरच 'सबका मलिक एक' संदेश देणारे व करोडो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या साईबाबा समाधी मंदिरातील साईबाबांच्या मूर्तीचे संवर्धन करण्यासाठी तसेच मूर्तीची झीज रोखण्यासाठी भाविकांसाठी दर्शन व्यवस्था तीन तास बंद ठेवून मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयाच्या तज्ज्ञांमार्फत शुक्रवारी साईमूर्तीची पाहणी केली.

साईबाबांच्या मूर्तीची झीज टाळण्यासाठी तज्ज्ञांनी मूर्तीच्या स्नानासाठी कमी पाण्याचा वापर करणे, मूर्तीला आंघोळ घातल्यानंतर टॉवेलने घासणे, दही-दुधाचा, गंधाचा वापर टाळणे, गंधासाठी चंदनाचाच वापर करणे आदी तोंडी सूचना केल्या. काही अंशी मूर्तीची झीज झाल्याचेही तज्ज्ञांनी मान्य केले. याबाबतचा लेखी अहवाल संस्थानला प्राप्त झाल्यानंतर साई संस्थानची समिती निर्णय घेईल, असे संस्थानचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी सांगितले.

वस्तुसंग्रहालयाचे एस मुखर्जी यांच्या नेतृत्वाखालील पाच तज्ज्ञांचे पथक सकाळीच शिर्डीत दाखल झाले.या पथकाने द्वारकामाई मंदिराची पहाणी केली. त्यानंतर दुपारी पावणेदोन नंतर साईमंदिर पूर्णपणे बंद करण्यात आले. मंदिरातील सीसीटीव्ही यंत्रणाही बंद करण्यात आली. याशिवाय मूर्तीच्या बाजूने पडदे लावून मूर्तीचे मायक्रो इन्सपेक्शन करण्यात आले. विशेष म्हणजे मूर्तीचे पावित्र्य जपण्यासाठी तज्ज्ञांनी सोहळे परिधान केले होते. मुर्तीला जेथे काळे डॉट आले आहेत किंवा झीज झालेल्या ठिकाणची अद्ययावत कॅमेऱ्याने फोटोग्राफी करून ते अभ्यासासाठी संगणकात संरक्षीत करण्यात आले. मूर्तीला काही इजा झालेली आहे किंवा काय याची पाहणी करण्यात आली.

चटई क्षेत्र निर्देशांकावर १८ टक्के जीएसटी आकारण्याचा केंद्र सरकारचा प्रस्ताव

मुंबई– देशभरात घरांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करणे कठीण होत आहे. असे असताना आता त्यांचे स्वप्न आणखी महागणार आहे. चटई क्षेत्र निर्देशांकावर (एफएसआय) १८ टक्के वस्तू आणि सेवाकर (जीएसटी) आकारण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने तयार केला आहे. यासंबंधीचा निर्णय लागू झाल्यास देशभरातील घरांच्या किमतीत १० टक्क्यांनी वाढ होण्याची भीती दि कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडियाने ('क्रेडाय') व्यक्त केली आहे.

दत्त शिरोळ कारखान्याचे अध्यक्ष रघुनाथ देवेगौडा यांच्यासह शिष्टमंडळाची कोल्हे कारखान्यास भेट

कोपरगाव (प्रतिनिधी)– दत्त शिरोळ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष रघुनाथ देवेगौडा पाटील व त्यांच्या शिष्टमंडळाने सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखान्यास नुकतीच सदिच्छा भेट देवून पाहणी केली.

त्यांचा संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे व युवा नेते विवेक कोल्हे यांच्यावतीने संचालक बाळासाहेब वक्ते यांनी सत्कार केला. कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार यांनी कोल्हे कारखान्याने बिपीन कोल्हे व विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना व उप प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविण्याचा प्रयत्न सुरू आहे तसेच उस विभागामार्फत उसाचे अतिरिक्त उत्पादन वाढविण्यासंदर्भात ठोस कृती कार्यकम हाती घेतला असल्याची माहिती दिली.

रघुनाथ देवेगौडा पाटील म्हणाले, स्व. शंकरराव कोल्हे यांनी देशात सहकारी साखर कारखानदारीत आधुनिक तंत्रज्ञानाचा कार्यक्षम वापर करून कमी पाण्यात अधिक ऊस उत्पादन देणाऱ्या ऊस जातींचा अभ्यास करत सभासद शेतकऱ्यांच्या उत्पादनवाढीत मोलाची भर घातली त्यांची प्रकर्षाने आठवण होते. दत्त शिरोळ कारखान्याने सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते गणपतराव सारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली २५०० एकरापैकी १५०० एकर क्षारपड जमिनींची सुधारणा करून त्यातून प्रति एकरी ६० ते ७० मे. टन उसाचे उत्पादन घेण्याचा कृतीशील कार्यक्रम हाती घेतला. याची केंद्र सरकार व जगभरातील सर्व क्षारपड संस्थांनी नोंद घेवून या कामाचे देशपातळीवर व जगातील नामांकित संशोधन संस्थांनी कौतुक केले आहे. शंकरराव कोल्हे कारखाना कार्यक्षेत्रातील अशा क्षारपड जमिनी विकसीत करण्याबाबत आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य देऊ, अशी ग्वाही दिली. केन मॅनेजर जी. बी. शिंदे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मॅनेजर प्रकाश डुंबरे यांनी केले.

नवी आशा नवी दिशा सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. • संपादक- * अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहिल्यानगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)